प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

भाषेतर विषय : भाग - १

इयत्ता १ ली ते ५ वी

विषय : कार्यानुभव

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

भाषेतर विषय : भाग - १

इयत्ता १ ली ते ५ वी

विषय : कार्यानुभव

अनुक्रमणिका

अ. क्र. **पृष्ठ क्र.**

१) प्रस्तावना १७१

२) कार्यानुभव विषयाची ठळक उद्दिष्टे (इयत्ता १ ली ते ८ वी) १७३

३) कार्यानुभव विषयाची सामान्य उद्दिष्टे (इयत्ता १ ली ते ८ वी) १७४

४) कार्यानुभव अभ्यासक्रम स्वरूप (इयत्ता १ ली ते ८ वी) १७५

५) सामान्य उद्दिष्टे (इयत्ता १ ली ते ५ वी) १७५

६) अध्ययननिष्पत्ती (इयत्ता १ ली ते ५ वी) १७६

७) कार्यानुभव विषयातील उपक्रमांचे स्वरूप (इयत्ता १ ली ते ५ वी) १७९

अ) गरजाधिष्ठित उपक्रम (इयत्ता १ ली ते ५ वी) १८४

ब) अभिरुची पूरक उपक्रम (इयत्ता १ ली ते ५ वी) १९०

क) कौशल्याधिष्ठित उपक्रम (इयत्ता १ ली ते ५ वी) १९२

८) ऐच्छिक उपक्रम

(अ) उत्पादक क्षेत्रे १९४

(१) अन्न १९४

(२) वस्त्र २०२

(३) निवारा २१०

(ब) तंत्रज्ञान क्षेत्रे २१५

(क) इतर क्षेत्रे २२६

९) मूल्यमापन निर्देश २२८

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२

इयत्ता १ ली ते ५ वी

विषय - कार्यानुभव

प्रस्तावना :

विविध कार्यांतून, कृतींतून आपले जीवन स्थिर, समृद्ध व आनंददायी करणे हे मानवाचे जीवनविषयक कर्तव्य समजले जाते. नवनिर्मिती करणे हा मानवाचा स्थायीभाव आहे. गरजापूर्तीसाठी विविध प्रकारच्या कार्याला ज्ञानाची व कौशल्याची जोड देऊन जीवन अधिकाधिक समृद्ध करण्याकडे मानव प्रगतीची वाटचाल करीत आहे. दैनंदिन जीवनात कार्याला कौशल्यविकासाची व विविध कल्पना–आविष्काराची जोड मिळाली तर ते कार्य अधिकाधिक अर्थपूर्ण होत जाते, हे लक्षात घेता कार्याचे महत्त्व वाढले आहे.

कार्यसंस्कृती हे जीवनाचे तसेच ज्ञाननिर्मितीचे अभिन्न अंग बनले तरच मानवाचा सर्वांगीण विकास सहजसाध्य होत जातो. हे लक्षात घेता शालेय अभ्यासक्रमात कार्यानुभवाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. कार्यकेंद्रित शिक्षणाचा पाया अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांचे चिकित्सक विचार, सर्जनशीलता, कार्यप्रेरणा, सौंदर्याभिरुची, संज्ञापन कौशल्ये, उद्यमशीलता व सामाजिक जबाबदारी यांचा परिपोष होत जाणे आवश्यक आहे. कार्यानुभव विषयाचा पाया हा कृतिकेंद्रित शिक्षणावर आधारित आहे. विद्यार्थी केंद्रित शिक्षण व कृतिप्रधानता ही या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये आहेत.

या विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना प्रामुख्याने 'कृतिकेंद्रित शिक्षण' या संकल्पनेवर भर दिला आहे. बौद्धिक, भावनिक, शारीरिक विकासाला कौशल्यविकासाची साथ मिळाल्यामुळे सर्वांगीण विकासाला अर्थ प्राप्त करून देण्याचे कार्य या विषयाच्या माध्यमातून केले जाईल, अशा अध्ययन अनुभवांची योजना या विषयाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

विद्यार्थी हा ज्ञाननिर्माता व्हावा व तो अध्ययनाच्या प्रक्रियेत जास्तीत जास्त कार्यमग्न राहावा याकरिता बदलत्या सामाजिक, आर्थिक, भौतिक परिस्थितीचा विचार करून विविध विषयांतील नवनवीन दिशा व त्यांचे कार्यजगत लक्षात घेऊन विविध उपक्रमांची योजना केली आहे. जागतिक व राष्ट्रीय आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी यावे याकरिता नवनवीन क्षेत्रांचा समावेश या अभ्यासक्रमात केला आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रमात कार्यानुभव हा विषय इयत्ता पहिलीपासून इयत्ता दहावीपर्यंत अनिवार्य विषय म्हणून अंतर्भूत करण्यात आला आहे.

कार्यानुभव विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, नॅशनल फोकस ग्रुप, एनसीईआरटीचा अभ्यासक्रम, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० आणि आरटीई विधेयक २००९ यांतील शिफारशींचा विचार करून विविध नवीन क्षेत्रांतील पायाभूत कौशल्येनिर्मिती व विकसनाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. आवश्यक अशा पायाभूत विकसनाकरिता अनिवार्य घटक व

स्थानिक परिस्थिती, अभिरुची आणि गरज यांचा विचार करून उद्योजकतेची पायाभरणी होण्याकरिता ऐच्छिक उपक्रमांद्वारे उत्पादक उपक्रम व तंत्रज्ञानविषयक उपक्रमांची रचना करण्यात आली आहे. तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या विषयाचा ऐच्छिक उपक्रम म्हणून समवेश हे या अभ्यासक्रमाचे खास वैशिष्ट्य होय.

कार्यानुभव विषयातील विविधतेचे व उपक्रमांचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन इयत्ता पहिली ते आठवीचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला त्यातील विविध क्षेत्रे जीवनाशी संबंधित असून त्यात नवनवीन घटकांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे ऐच्छिक घटकांची निवड करण्यास भरपूर वाव आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा केंद्रस्थानी ठेवून त्यांच्याशी संबंधित घटक विचारात घेतले आहेत. विषयनिहाय धोरणात्मक शिफारशींशी सुसंगतता राखून प्रत्येक घटकाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. शिक्षणप्रक्रियेतील सर्व घटकांसाठी तो स्वागतार्ह ठरेल अशी अपेक्षा आहे.

कार्यानुभव अभ्यासक्रम उपक्रमनिहाय भारांश

(इयत्ता १ली ते ८वी)



- उपरोक्त उपक्रम निहाय भारांश सर्वसाधारणपणे दिलेला आहे. स्थानिक परिस्थिती व उपलब्ध साधन सुविधा यांचा विचार करून यात आवश्यकतेनुसार बदल करता येईल. तथापि कार्यानुभव विषयासाठी निर्धारित केलेल्या तासिका मध्ये बदल करता येणार नाही.

कार्यानुभव विषयाची ठळक उद्दिष्टे

इयत्ता १ ली ते ८ वी

१) **श्रमप्रतिष्ठा :**
श्रम आणि कौशल्ये यांवर आधारित कामे करणे, तसेच श्रमजीवी लोकांबद्दल आदराची भावना ठेवून त्यांचा सन्मान करणे.

२) **उद्योजकतेचे शिक्षण :**
विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी असलेल्या सुप्त गुणांचा विकास करणे, तसेच उपजत असलेल्या गुणांना वाव देऊन उद्योजकतेविषयीचे आवश्यक ज्ञान देणे.

३) **जीवनक्षमता विकसित करणारी कौशल्ये :**
विद्यार्थ्यांच्या गरजा व समस्या यांच्याशी निगडित उपक्रमांद्वारे निरोगी व आनंदमय जीवन जगण्यासाठी कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे.

४) **समाजोपयोगिता व कार्यजगत यांचे समन्वेषण :**
कार्यानुभवातील उपक्रमांतून समाजातील उद्योगमूलक कार्याची ओळख करून घेण्याची संधी प्राप्त करून देणे आणि समाजविकसनासाठी त्यांचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे.

५) **कार्यातील स्वभूमिकेची समज :**
विविध उपक्रमांतील कार्यनिश्चितीनंतर, त्या कार्यातील स्वभूमिका समजावून घेऊन त्यातील कार्यकारणभाव, शास्त्रीय तत्त्वे व क्रमवारिता यांची माहिती घेणे.

६) **अर्थोत्पादन क्षमता :**
उत्पादक उपक्रमाचा सराव करत असताना, विद्यार्थ्यांमध्ये उत्पादनास आवश्यक अशी प्राथमिक कौशल्ये निर्माण करणे व शक्य तेथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात मर्यादित अर्थोत्पादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

७) **कार्यकौशल्य विकास :**
उत्पादक कार्यातील सुबकता, अचूकता, आकर्षकता, गती, निर्मिती, प्रदर्शन व विक्री यांबाबतची कौशल्ये विकसित करणे.

८) **कार्यसंस्कृतीचे जतन व संवर्धन :**
परिसरातील विविध कार्यांची ओळख करून घेणे, सामाजिक रूढी, परंपरा आणि प्रथा यांच्यामागील कार्याची ओळख करून घेणे, कार्यकारणभाव जाणून त्यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत करणे.

९) **अनिवार्य उपक्रम :**
सर्व शाळांमध्ये उपक्रमांच्या बाबतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये समाजोपयोगी कार्याची वृत्ती जोपासण्यासाठी अनिवार्य उपक्रमांची योजना करणे.

१०) **कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव :**
अनिवार्य उपक्रमांतून तसेच उत्पादक उपक्रमांतून पर्यावरण संरक्षण व संवर्धन यांची जाणीव निर्माण करणे.

कार्यानुभव विषयाची सामान्य उद्दिष्टे
इयत्ता १ ली ते ८ वी

(१) आधुनिक तंत्रज्ञान, राष्ट्रीय परंपरा, संस्कृती यांचा समन्वय साधण्याची आवश्यकता समजून घेणे.

(२) स्थानिक, वैश्विक व मुक्त व्यवस्था यांचा होणारा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव जाणून घेणे.

(३) नैसर्गिक, सामाजिक व मानवी आंतरप्रक्रियेची जाणीव निर्माण करणे.

(४) मानवी जीवनातील ताणतणाव, ते दूर करण्याचे मार्ग व त्यांची साधने जाणून घेणे.

(५) दैनंदिन जीवनातील माहितीचे आकलन व उपयोजन करून निश्चित दिशा विकसित करणे.

(६) नैतिक, सामाजिक व राष्ट्रीय मूल्यांभोवती गुण केंद्रिभूत करून समाजाला उपयोगी नागरिक घडविणे.

(७) पूर्व व्यावसायिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे.

(८) आधुनिक तंत्रज्ञान व मानवी कार्यक्षमता या एकमेकांस पूरक राहतील याची जाणीव निर्माण करणे.

(९) दृक्श्राव्य कलांच्या सादरीकरणातून सृजनशीलता व स्वप्रकटीकरण क्षमता जोपासणे.

(१०) सार्वजनिक साधनसंपत्तीची जपणूक करणे.

◎◎◎

कार्यानुभव अभ्यासक्रम : स्वरूप

इयत्ता १ ली ते ८ वी (सर्वसाधारण)



(अ) संस्कृती आणि कार्यजगताची ओळख

(ब) जलसाक्षरता

(क) आपत्ती व्यवस्थापन

कार्यानुभव विषयाची सामान्य उद्दिष्टे

इयत्ता १ ली ते ५ वी

१) सभोवतालच्या पर्यावरणाविषयीची माहिती घेणे. मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्परावलंबन समजून घेणे.

२) हस्तकौशल्य आणि श्रमप्रतिष्ठा यांबद्दल आदर निर्माण करणे.

३) सहकार्य, सहनशीलता, उपक्रमात सक्रिय सहभाग व दुसऱ्यांची काळजी घेणे यासारखी इष्ट मूल्ये रुजवणे.

४) दृक्–श्राव्य कलांच्या सादरीकरणातून सर्जनशीलता आणि स्वप्रकटीकरण क्षमता जोपासणे व सौंदर्यदृष्टी विकसित करणे.

५) प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, इतरांबद्दल आदर, नियमितपणा, वक्तशीरपणा इत्यादी मानवी मूल्ये विकसित करणे आणि इतरांमधील चांगल्या गुणांची प्रशंसा करणे.

६) स्थानिक आणि राष्ट्रीय सांस्कृतिक परंपरांचा आदर करणे.

७) राष्ट्रीय सांस्कृतिक एकात्मतेची भावना निर्माण करणे.

८) नेतृत्वगुण विकसित करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे व तिचे संरक्षण करणे.

१०) स्थानिक परिसरातील सार्वजनिक सोयी–सुविधांची माहिती घेणे व त्यांचा योग्य उपयोग करणे.

अध्ययननिष्पत्ती
इयत्ता १ ली ते ५ वी

१) सभोवतालच्या पर्यावरणाविषयी माहिती घेणे, मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्परावलंबन समजून घेणे.

अ) सभोवतालच्या पर्यावरणातील प्राणी, पक्षी आणि वृक्षवल्ली यांची ओळख करून घेतो आणि त्यातून सौंदर्याचा आणि आनंदाचा आस्वाद घेतो.

ब) सभोवतालच्या पर्यावरणावर प्रेम करतो आणि परसातील बागकाम, फुलझाडांची व शोभिवंत झाडांची लागवड यांसारख्या उपक्रमांत प्रत्यक्ष सहभागी होतो.

क) सभोवतालचा परिसर स्वच्छ आणि नीटनेटका राखतो.

ड) नैसर्गिक साधनसंपत्ती जपतो.

ई) सांघिक व वैयक्तिक कामातून सामाजिक संबंध जपतो.

२) हस्तकौशल्य आणि श्रमप्रतिष्ठा यांबद्दल आदर निर्माण करणे.

अ) वर्ग, शाळा आणि शालेय परिसर स्वच्छ आणि सुंदर राखण्यासाठी सांघिक कामात सहभागी होतो.

ब) कार्यपरिसर स्वच्छ राखतो.

क) हाताने तयार केलेल्या वस्तूंचे कौतुक करतो.

ड) श्रमजीवी लोकांशी आदराने वागतो.

३) सहकार्य, सहनशीलता, उपक्रमांत सक्रिय सहभाग व इतरांची काळजी घेणे यांसारखी इष्ट मूल्ये रुजविणे.

अ) समूहगीत, समूहनृत्य यांत आनंदाने सहभागी होतो.

ब) इतरांना कामात वेळोवेळी मदत करतो.

क) पाळीव प्राण्यांची काळजी घेतो.

ड) शालेय, कौटुंबिक आणि विविध सामाजिक उपक्रमांत आवडीने काम करतो.

ई) वर्गमित्रांच्या मेळाव्यात रमतो.

फ) शालेय प्रार्थना आणि परिपाठ घेतो.

ग) वडीलधाऱ्या माणसांची काळजी घेतो.

च) विविध प्रकारच्या सामूहिक कार्यात खिलाडू वृत्ती दाखवतो.

४) दृक्–श्राव्य कलांच्या सादरीकरणांतून सर्जनशीलता आणि स्वप्रकटीकरण क्षमता जोपासणे व सौंदर्यदृष्टी विकसित करणे.

अ) मातकाम, कागदकाम, काथ्याचे विणकाम यांसारख्या उत्पादक उपक्रमात सहभागी होतो.

ब) विविध ललित कला प्रकारांत अभिरुची दाखवतो.

क) आवडीनुसार, क्षमतेनुसार आणि उपलब्ध साधनसुविधेनुसार उत्पादक उपक्रम निवडतो.

५) प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, इतरांबद्दल आदर, नियमितपणा, वक्तशीरपणा इत्यादी मानवी मूल्ये विकसित करणे आणि इतरांमधील चांगल्या गुणांची प्रशंसा करणे.

अ) सर्व प्रकारच्या कृतींमध्ये नियमितपणा व वक्तशीरपणा पाळतो.

ब) इतरांशी आदराने वागतो.

क) विद्यार्थीमित्रांच्या गटात आनंदाने खेळतो व कामे करतो.

ड) स्वतःच्या हातून चुका झाल्यावरही स्वतःशी प्रामाणिक राहतो व सत्य बोलतो

इ) इतरांच्या सद्वर्तनाबद्दल आदर दाखवतो.

फ) इतरांच्या चांगल्या गुणांची प्रशंसा करतो.

६) स्थानिक आणि राष्ट्रीय सांस्कृतिक परंपरांचा आदर करणे.

अ) राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील सण/उत्सव, कार्यक्रमांत उत्साहाने सहभागी होतो.

ब) विशेष प्रसंगी एकमेकांना शुभेच्छा देतो.

क) विविध धार्मिक सणांत/उत्सवांत/कार्यक्रमांत सहभागी होतो.

ड) स्थानिक परंपरांची माहिती करून घेतो.

७) राष्ट्रीय सांस्कृतिक एकात्मतेची भावना निर्माण करणे.

अ) विविध भाषांमधील समूहगीतांत सहभागी होतो.

ब) विविध जाती, धर्म, रूढी, व परंपरा यांचा आदर करतो.

क) विविध राज्यांतील सण, उत्सव व ऐतिहासिक वास्तू यांची माहिती घेतो.

८) नेतृत्वगुण विकसित करणे.

अ) निरनिराळ्या कार्यक्रमांचे नेतृत्व करतो.

ब) गटातील सदस्यांचे नेतृत्व करून कृती करून घेतो.

क) गटातील सदस्यांच्या समस्या व अडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करतो.

९) सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे व तिचे संरक्षण करणे.

अ) घर, शाळा व परिसर यांच्याशी जवळीक साधून त्यांची स्वच्छता राखतो.

ब) शाळेतील वेगवेगळ्या वस्तूंची काळजी घेतो.

क) सार्वजनिक ठिकाणे उदा., रस्ते, क्रीडांगण, ग्रंथालय, ऐतिहासिक वास्तू, प्रार्थनास्थळे आणि बाग इत्यादी ठिकाणी आवश्यक स्वच्छता राखतो.

१०) स्थानिक परिसरातील सार्वजनिक सोयीसुविधांची माहिती घेणे व त्यांचा योग्य उपयोग करणे.

अ) सार्वजनिक ठिकाणच्या सोयीसुविधांची माहिती घेतो व त्यांचा उपयोग करतो. (उदा. पोस्ट ऑफिस, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक पाणवठे, विहीर, हातपंप, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी)

ब) वाहतुकीच्या नियमांचे पालन करतो.

क) सार्वजनिक ठिकाणी शांतता राखतो.

◎◎◎

कार्यानुभव विषयातील उपक्रमांचे स्वरूप

इयत्ता १ ली ते ५ वी

कार्यानुभव विषयात प्रमुख दोन प्रकारच्या उपक्रमांचा समावेश केलेला आहे. १) अनिवार्य उपक्रम २) ऐच्छिक उपक्रम.

१) अनिवार्य उपक्रम : सर्व शाळांनी कार्यान्वित करणे बंधनकारक आहे.

अनिवार्य उपक्रम

↓

(अ) गरजाधिष्ठित उपक्रम

१) संस्कृती आणि कार्यजगताची ओळख

२) जलसाक्षरता

३) आपत्ती व्यवस्थापन

(यातील प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अभ्यासक्रम दिलेला आहे. तो संपूर्ण अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करून घ्यावा.)

(ब) अभिरुचीपूरक उपक्रम

(इयत्तावार दिलेल्या अभिरुचीपूरक उपक्रमांपैकी वर्षभरात **किमान दोन** उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत.)

(क) कौशल्याधिष्ठित उपक्रम

(इयत्तावार दिलेल्या कौशल्याधिष्ठित उपक्रमांपैकी वर्षभरात **किमान दोन** उपक्रम विद्यार्थांच्या आवडीनुसार करून घ्यावेत)

२) ऐच्छिक उपक्रम : (इयत्ता १ ली ते ५ वी)

या उपक्रमांतर्गत दिलेल्या तीन क्षेत्रांपैकी कोणत्याही एका क्षेत्राची निवड करावी. ही निवड उपलब्ध साधनसुविधा व विद्यार्थ्यांची आवड व गरज लक्षात घेऊन करावी. उत्पादक क्षेत्राची निवड केल्यास अन्न, वस्त्र, निवारा या उपक्षेत्रांतून दिलेल्या प्रत्येकी एका उपक्रमाची निवड करणे अनिवार्य आहे. म्हणजे उत्पादक क्षेत्रात एकूण तीन उपक्रम वर्षभरात पूर्ण करून घ्यायचे आहेत.

- **ऐच्छिक उपक्रम**

(अ) उत्पादक क्षेत्रे

अन्न : (१) परसातील बागकाम
(२) कुंडीतील लागवड
(३) फळप्रक्रिया
(४) मत्स्य व्यवसाय

वस्त्र : (१) वस्त्रनिर्मिती
(२) प्राथमिक शिवणकाम
(३) बाहुलीकाम
(४) काथ्याचे विणकाम

निवारा : (१) मातकाम
(२) बांबूकाम व वेतकाम
(३) फुलझाडांची व शोभिवंत झाडांची लागवड

(ब) तंत्रज्ञान क्षेत्रे

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान

(क) इतर क्षेत्रे

(१) शेतीपूरक व्यवसाय (पशुपक्षी संवर्धन)

(२) स्थानिक परिस्थिती आणि उपलब्ध साधनसुविधा लक्षात घेऊन नवीन उपक्रमाची निवड इतर क्षेत्रांमध्ये करता येईल. त्यासाठी नवीन उपक्रमाचा अभ्यासक्रम तयार करून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांची मान्यता घ्यावी.

टीप : महाराष्ट्र राज्य स्काऊट गाईड या संस्थेने तयार केलेला कब/बुलबुल आणि स्काऊट/गाईडचा अभ्यासक्रम स्वतंत्र दिलेला आहे.
प्रत्येक शाळेत किमान एक बालवीर/वीरबाला पथक असावे.

कब / बुलबुल आणि स्काऊट / गाईड

- **इयत्ता १ ली ते ४ थी – कब / बुलबुल**

  प्रत्येक शाळेत किमान एक तरी पथक असावे.

- **अभ्यासक्रम –**

  कब/बुलबुल : प्रवेश

  १) गोष्ट
  २) ध्येय, नियम, वचन, स्वागताची पद्धत.
  ३) वंदन, हस्तांदोलन
  ४) प्रार्थना
  ५) सत्कृत्य
  ६) गणवेश
  ७) बुलबुल वृक्ष
  ८) वचन विधी
  ९) बुलबुल/कब समारंभ

  कब/बुलबुल: प्रथम चरण/ कोमल पंख
  द्वितीयचरण/रजतपंख

  कब/बुलबुल: तृतीय चरण/ सुवर्ण पंख

  कब/बुलबुल: चतुर्थचरण/हीरकपंख
  सुवर्ण बाण

इयत्ता – ५ वी ते ८ वी
स्काऊट / गाईड

स्काऊट/गाईड : प्रवेश

१) संक्षिप्त माहिती
२) इतिहास
३) नियम व वचन
४) ध्येय, वंदन, हस्तांदोलन
५) सत्कृत्य
६) गणवेश
७) ध्वज

८) प्रार्थना, झेंडागीत, राष्ट्रगीत
९) मेळावा
१०) वचन विधी समारंभ

स्काऊट/गाईड : प्रथम सोपान

१) विषयप्रवेश
२) आरोग्याचे नियम
३) शिट्टीच्या व हाताच्या खुणा
४) मागाच्या खुणा
५) दोरीची टोके शेवटणे
६) गाठी
७) खेळ
८) साधी कवायत
९) प्रथमोपचार
१०) संघसभा/ संघसहल
११) गॅझेटस्/हस्तकला
१२) सेवा/स्वच्छता प्रकल्प
१३) निसर्ग अभ्यास प्रकल्प
१४) शेकोटी

स्काऊट/गाईड : द्वितीय सोपान

१) पायोनिअरिंग
२) अग्नी पेटवणे
३) स्वयंपाक
४) होकायंत्र
५) प्रथमोपचार
६) सद्वर्तन
७) अंदाज
८) खेळ
९) संदेशन
१०) प्रार्थना
११) प्रावीण्य पदके

स्काऊट/गाईड : तृतीय सोपान

१) शिबिर विद्या प्रात्यक्षिक
२) प्रावीण्य पदक
३) अंदाज
४) प्रथमोपचार
५) नकाशा
६) शिबिर/सहल/स्वयंपाक
७) संघ मोहीम आखणी
८) संदेशन
९) चर्चा व संभाषण
१०) चळवळीचा इतिहास
११) राज्य पुरस्कार

◎◎◎

(अ) गरजाधिष्ठित उपक्रम

(१) संस्कृती व कार्यजगताची ओळख.

सर्वसाधारणपणे समाजघटकांचे आचारविचार, रीतीरिवाज, परंपरा यांचे एकत्रीकरण म्हणजे संस्कृती होय. ती संस्कृती राष्ट्राच्या नावाने ओळखली जाते. उदा. आपल्या देशाची संस्कृती ही 'भारतीय संस्कृती' म्हणून ओळखली जाते. प्रत्येक भारतीय नागरिक हा भारतीय संस्कृतीचा प्रतिनिधी म्हणून ओळखला जावा यासाठी आधी कुटुंबातून व नंतर शाळेतून सुयोग्य संस्कारांद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला संस्कृतीची ओळख करून द्यायला हवी.

या विशिष्ट हेतूने 'संस्कृती व कार्यजगताची ओळख' या उपक्रमाचा समावेश कार्यानुभव विषयात केला आहे. त्याची अमंलबजावणी दैनंदिन परिपाठाच्या वेळी करावी.

उद्दिष्टे

(१) स्थानिक व राष्ट्रीय सांस्कृतिक कार्यजगताची ओळख करून घेणे.
(२) आधुनिक तंत्रज्ञानाशी राष्ट्रीय परंपरा व संस्कृती यांची सांगड घालणे.
(३) स्थानिक पर्यावरणाची माहिती करून घेणे.
(४) श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, वक्तशीरपणा, स्वाभिमान इत्यादी इष्ट मूल्ये रुजवणे व ती विकसित करणे.
(५) स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी यांचे संवर्धन करणे.

इयत्ता १ ली

(१) वर्गाचे सुशोभन करणे.
(२) बडबडगीते, श्लोक, प्रार्थना इत्यादी म्हणणे.
(३) परिसराची माहिती घेणे.

इयत्ता २ री

(१) वर्गाचे सुशोभन करणे, साहित्य व साधने व्यवस्थित ठेवणे.
(२) माहितीस्रोत : दिनविशेष, पर्यावरणविषयक माहिती घेणे.
(३) उद्योजकता : एखाद्या लघुउदयोगासंबंधी माहिती सांगणे

इयत्ता ३ री

(१) सुशोभनासाठी सोपे साहित्य तयार करणे. (उदा. फुलांच्या माळा, गुच्छ)
(२) रंगीत कागद, कापडाचे तुकडे यांच्यापासून पताका तयार करणे.
(३) लहान वर्णनपर उतारे, तालबद्ध गीत, कथा यांचे सादरीकरण करणे.
(४) स्थानिक सण, समारंभ, उत्सव यांची माहिती घेणे.

इयत्ता ४ थी

(१) रांगोळ्यांच्या साहाय्याने सुशोभन करणे.

(२) फळ्यावर सुविचार लेखन करणे.

(३) वृत्तपत्र/आकाशवाणी/दूरदर्शनद्वारे प्रसारित झालेल्या किमान दोन ठळक बातम्या सांगणे.

(४) परिसरातील लहान उद्योगांची यादी तयार करून त्याची माहिती देणे.

इयत्ता ५ वी

(१) कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व सांगणे.

(२) आकर्षक सुविचार–म्हणी लेखन करणे.

(३) स्थानिक सण, समारंभ, उत्सव याप्रसंगी स्वयंसेवकाची भूमिका स्विकारणे.

(४) परिसरातील उद्योगांची यादी तयार करुन त्याची माहिती सांगणे.

◎◎◎

(२) जलसाक्षरता

जल म्हणजे जीवन. योग्य नियोजनाअभावी पाणी समस्येची परिस्थिती वास्तवात जाणवत आहे. अशा वेळी पाण्याची मूलभूत गरज व त्याची कमतरता यांचा विचार करता 'जलसाक्षरता' या उपक्रमातून पाण्याबद्दल जाणीव व जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

पाण्याची एकूण उपलब्धता व लोकसंख्येच्या प्रमाणात त्याचा वापर हे व्यस्त प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या दृष्टीने विचार करता जलसाक्षरतेचे ज्ञान देणे आवश्यक आहे. पाण्याचे स्रोत, साठवणूक, नियोजन, बचत, पुनर्वापर व स्वच्छता इत्यादींबद्दलच्या जाणीव जागृती निर्माण करणे. विद्यार्थ्यांमध्ये पाण्याविषयी सजगता निर्माण केली तर त्यांचे जीवन सुकर होण्यास मदत होईल.

उद्दिष्टे

(१) जलसाक्षरतेविषयी आवश्यक ज्ञान, मूल्ये, बांधीलकी, कौशल्य प्राप्त करण्याची संधी देणे.
(२) जलसाक्षरतेविषयी वर्तनाचे नवीन धडे घालून देणाऱ्या व्यक्ती, समूह व समाज निर्माण करणे.
(३) पाण्याची गरज व उपलब्धता जाणून घेणे.
(४) पाणीविषयक समस्या व त्या दूर करण्याचे मार्ग जाणून घेणे.

इयत्ता १ ली

(१) बडबडगीते
(२) पिण्याचे पाणी
पाणी पिण्याच्या पद्धती
- प्राणी
- पक्षी
- मनुष्य

(३) चित्र ओळख
- कारंजे, मासे
- रोपांना पाणी
- नदी, विहीर, धरणे, समुद्र, तलाव

(४) प्रयोग/प्रात्यक्षिक
घडीकामातून कागदाची होडी तयार करणे व पाण्यात सोडणे.
(५) पाण्याचे प्रवाह

इयत्ता २ री

(१) बडबडगीते
(२) पाण्याचे उपयोग
(३) वर्षादर्शन

(४) पाण्यासंबंधी गोष्ट/कथा सांगणे
(५) पाणी साठवण
(६) चित्र रंगवणे (जलसाक्षरता)

इयत्ता ३ री

(१) घरगुती पाण्याचा काटकसरीने वापर
(२) शेती व कारखान्यासाठी पाणी वापर
(३) पाण्यातील अविद्राव्य घटक वेगळे करणे (पाणी गाळणे)
(४) पाण्याचे खेळ (मनोरंजनातून जलसाक्षरता)
(५) पाण्याचे बँक बुक – पाणी बचत कार्ड
(६) जलवाहतूक
(७) सार्वजनिक ठिकाणची पाणी साठवण पद्धती

इयत्ता ४ थी

(१) कविता
(२) आरोग्याकरिता पाणी
(३) शुद्ध पाणी, अशुद्ध पाणी
(४) पाण्यासंबंधी म्हणींचा संग्रह
(५) घरात वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर
(६) पाण्याचे उपयोग
(७) पिण्याच्या पाण्याचे नलिकाजाळे
(८) जलदिनानिमित्त जलसाक्षरता या विषयावर प्रदर्शन

इयत्ता ५ वी

(१) पाण्यासंबंधी वाक्प्रचारांचा संग्रह
(२) नदीला पूर का व कसे येतात?
(३) पाण्याचा हिशोब
(४) प्रयोग • पाणी मोजणे
• पाऊस मोजणे
(५) पाण्याच्या वहन पद्धती
(६) पाण्यावर आधारित शब्दकोडे
(७) पाणी तापविण्याची साधने
(८) पाणी व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान.

(३) आपत्ती व्यवस्थापन

प्रस्तावना :

आपत्ती व व्यवस्थापन हे दोन वेगवेगळे शब्द आहेत. व्यवस्थापन हा शब्द शिक्षण, व्यवसाय, उद्योग अशा ठिकाणी ऐकावयास मिळतो. कोणतेही काम तत्परतेने, सुलभ, नीटनेटके होण्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते. सुनियोजित व्यवस्थापनामुळे श्रम, पैसा व वेळेची बचत होते. आपत्ती म्हणजे संकट किंवा दुर्घटना. आपत्ती केव्हाही सांगून येत नसते. आपत्तीची वेळ, काळ, स्वरूप याविषयी काहीही अंदाज बांधता येत नाही. आपत्तीला रोखणे अथवा आपत्तीचा परिणाम कमी करून मानवी जीवन सुलभ बनवणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा मूलभूत उद्देश आहे.

आधुनिक काळात आपत्ती व्यवस्थापन हा जागतिक पातळीवरील अभ्यासाचा विषय बनला आहे. आपत्ती व्यवस्थापनासंबंधीची जाणीव व जागृती लहानपणापासूनच होणे आवश्यक आहे. या उद्देशानेच इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी या प्राथमिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाविषयी जाणीव जागृती करून देणे गरजेचे आहे, ज्यामुळे आपत्तीशी सामना करण्याचे तंत्र विद्यार्थ्यांना प्राप्त होईल.

शैक्षणिक, सामाजिक व आंतरराष्ट्रीय अशा सर्व स्तरांवर आपत्ती व्यवस्थापनाची गरज निर्माण झाली आहे. ज्या राष्ट्राने आपत्तीचे व्यवस्थापन व त्यानुसार कार्यवाही केली आहे, अशी राष्ट्रे आज कितीही मोठी आपत्ती येऊन गेल्यांनतरही समर्थपणे टिकून राहिलेली दिसतात याचे उदाहरण म्हणजे 'जपान' हे राष्ट्र होय. भौगोलिकदृष्ट्या जपान हे भूकंपप्रवण क्षेत्रात मोडणारे राष्ट्र आहे. सतत भूकंप होत असलेल्या या राष्ट्राने पूर्व प्राथमिक, प्राथमिक स्तरांपासून आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिलेले असल्यामुळे आज ते राष्ट्र भूकंपासारख्या आपत्तींना तोंड देऊन पुन्हा आपला विकास साधत आहे.

विद्यार्थ्यांचे वय, बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापनविषयक पुढील बाबींची माहिती विद्यार्थ्यांना देणे गरजेचे वाटते.

(१) आपत्तीची कारणे व परिणाम
(२) आपत्ती प्रतिबंधक मार्गाची माहिती
(३) सावधगिरीचा इशारा देण्याच्या विविध पद्धती व त्यांचे कार्य
(४) पूर्वसूचना मिळाल्यानंतर करावयाची कार्ये
(५) आपत्तीपासून स्वतःच्या व इतरांच्या बचावाचे कार्य
(६) इतरांच्या मदत कार्याविषयी व्यवस्थापन
(७) आपत्तीच्या काळात करावयाच्या व टाळावयाच्या गोष्टींची माहिती देणे.
(८) आपत्तीच्या वेळी अपेक्षित कृतीची कार्यवाही तसेच प्रात्यक्षिके यांची कार्यवाही.

अशा प्रकारे आपत्ती व्यवस्थापनांच्या माध्यमातून कोणत्याही आपत्तीवर मात करण्याची क्षमता प्राप्त होईल, व आपत्तीवर यशस्वीपणे मात करता येईल.

उद्दिष्टे :

(१) विविध प्रकारच्या आपत्तींबाबत माहिती देणे.

(२) आपत्तींची कारणे व त्यावरील उपाययोजनांबाबत माहिती देणे.
(३) आपत्तींपासून कसा बचाव करता येईल याबाबतची माहिती देणे.
(४) शालेय शिक्षणामध्ये मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करणे.
(५) विविध प्रकारच्या आपत्तींशी कशा प्रकारे सामना करता येईल याची जाणीव करून देणे.

आपत्ती व्यवस्थापन – अभ्यासक्रम आराखडा इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवी

इयत्ता	घटक/ उपघटक	व्याप्ती	उपक्रम	अध्ययन निष्पत्ती	शिक्षकांसाठी सूचना
१ ली	निसर्गाची ओळख	नैसर्गिक घटक	पाऊस, पूर, वादळ चित्रसंग्रह.	बडबड गीतांच्या माध्यमातून पाऊस, चित्राद्वारे पूर, वादळ यांची ओळख होते.	चित्रांच्या माध्यमातून निसर्गाची ओळख करून द्यावी.
२ री	निसर्गाची ओळख	नैसर्गिक घडामोडी	चित्राद्वारे नैसर्गिक घडामोडींची ओळख करून घेणे.	चित्र संग्रहातून नैसर्गिक घडामोडींची ओळख होते.	चित्रे व अन्य माध्यमातून नैसर्गिक घडामोडींची ओळख करून द्यावी.
३ री	नैसर्गिक आपत्ती	नैसर्गिक आपत्ती	चित्रफिती, चित्र काढणे याद्वारे नैसर्गिक आपत्तींची ओळख करून घेणे.	आपत्तींचे स्वरूप ओळखतात.	चित्रफिती, चित्र काढणे याद्वारे नैसर्गिक आपत्तींची ओळख करून द्यावी.
४ थी	आपत्तींचे प्रकार	नैसर्गिक आपत्ती प्रकार पर्यावरणीय: (१)पूर (२)वादळ (३)अतिवृष्टी (४)दुष्काळ (५)त्सुनामी इ. प्राकृतिक: १) भूकंप २) ज्वालामुखी ३) भूस्खलन इ.	विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींविषयक कात्रणे/ चित्रे यांचा संग्रह करणे,	नैसर्गिक आपत्तींचे विविध प्रकार ओळखतात.	विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींची ओळख करून द्यावी.
५ वी	नैसर्गिक आपत्ती व्यवस्था–पनाचा परिचय	भूकंप, पूर यासंदर्भात कारणे, उपाययोजना व व्यवस्थापन	भूकंप, पूर याविषयी पूर्वतयारी, घटना घडत असताना व घटनेनंतर घ्यावयाची दक्षता, उपाययोजना व व्यवस्थापन	भूकंप व पूर याविषयी उपायांची जाणीव/माहिती होते.	भूकंप, पूर याविषयी कारणे व उपाययोजनांची जाणीव करून द्यावी.

(ब) अभिरुची पूरक उपक्रम

इयत्ता १ ली ते ५ वी

प्रास्ताविक

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्रपणे भावना, दृष्टिकोन आणि विविध अंगभूत गुण वैशिष्ट्ये असतात. त्या गुणवैशिष्ट्यांना योग्य वळण दिल्यास त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, परिसरातील उपलब्ध साधनांच्या पुनर्वापराची क्षमता आणि सौंदर्यदृष्टी या बाबींचा परिपोष होऊ शकतो. विद्यार्थ्यांमध्ये परिसरातील उपलब्ध साधनांमधून नवनिर्मितीची जाणीव जागृत करणे, निर्भेळ आनंद मिळविणे, आधुनिकतेशी सांगड घालणे, यासाठी आयोजलेल्या उपक्रमांना अभिरुची पूरक उपक्रम म्हटले आहे.

अभिरुचीपूरक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वनिर्मितीच्या संदर्भाने आत्मविश्वास निर्माण होणार आहे. तसेच विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे उपक्रम प्रेरणादायी ठरतील

उद्दिष्टे

(१) विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा परिचय करून घेऊन त्या गुणांचा विकास करणे.

(२) विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाविषयी गोडी निर्माण होण्यासाठी सहज उपलब्ध होणाऱ्या साधनांचा वापर करणे.

(३) साहित्याचा पुनर्वापर करणे.

(४) सर्जनशीलता, नवनिर्मिती क्षमता, सौंदर्यदृष्टी, परस्परसहकार्य, पर्यावरणरक्षण, आधुनिकतेशी सांगड यासारख्या मूल्यांचा विकास करणे.

(५) विद्यार्थ्यांनी स्वनिर्मितीचा आनंद प्राप्त करणे.

इयत्ता १ ली

(१) विविध वस्तूंचा संग्रह करणे. (रंगीत कागद, रिकाम्या काडेपेट्या, कापडाचे तुकडे, सुतळी, रंगीत दोरे, लग्नपत्रिका, भेटकार्ड, बिया, पाने, फुले, शंख, शिंपले इत्यादी)

(२) रिकाम्या खोक्यांपासून वस्तू तयार करणे.

(३) रद्दी कागदापासून सौंदर्याकृती तयार करणे

(४) पाना–फुलांचा वापर करून सुशोभन करणे.

(५) काडेपेटीतील काड्यांपासून विविध आकार तयार करणे.

इयत्ता २ री

(१) रंगात पाय बुडवून कार्डशीट पेपरवर ठसे घेणे. त्यानुसार विविध प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या पायांचे ठसे अभ्यासणे, निरीक्षण करणे.

(२) रिकाम्या खोक्यांपासून गाडी, बाहुली, संगणक तयार करणे.

(३) कागद, कापूस, काड्या यांपासून (उदा. बाहुली, फुले, पक्षी, भेटकार्ड, चेंडू) एक वस्तू तयार करणे.

(४) शेंगांची टरफले, बिया, पाने, फुले चिकटवून सौंदर्याकृती तयार करणे.

(५) मातीपासून विविध प्रतिकृती तयार करणे.

इयत्ता ३ री

(१) रंगीत कागदापासून कोणतीही एक वस्तू तयार करणे – उदा., कान हालणारा ससा, पक्षी, पताका, माळा, तोरण, पाकीट इत्यादी.

(२) पुठ्ठ्यापासून हातपंखा, खेळणी तयार करणे.

(३) रिकाम्या खोक्यापासून मोबाईल स्टँड, कपाट, बचतपेटी, सोफा तयार करणे.

(४) साधी राखी तयार करणे.

(५) कागदाचे भिरभिरे तयार करणे.

इयत्ता ४ थी

(१) विदूषक तयार करणे.

(२) रिकाम्या खोक्यांपासून घर तयार करणे.

(३) भिंगरी तयार करणे.

(४) कागदाला घड्या घालून फुगा/बेडूक/साधा आकाशकंदील तयार करणे.

(५) ओल्या मातीपासून वाटी, पणती तयार करणे.

(६) मण्यांपासून माळा,तोरण, झुंबर तयार करणे.

इयत्ता ५ वी

(१) रद्दी कागदापासून टोपी तयार करणे.

(२) पेपरडिशपासून मुखवटे तयार करणे.

(३) पुठ्ठा व काडीपासून पिंजऱ्यातील पोपट तयार करणे.

(४) सुतळी, मणी, दोरा यापासून झुंबर, गोंडे तयार करणे.

(५) मातीपासून विविध प्रतिकृती तयार करणे.

***

(क) कौशल्याधिष्ठित उपक्रम

इयत्ता १ ली ते ५ वी

प्रस्तावना

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि कौशल्यात्मक अंगांचा समतोल विकास होणे अपेक्षित आहे. समाजाचा एक उत्पादक घटक म्हणून विद्यार्थ्यांतील कौशल्यांचा वापर सकारात्मक व्हायला हवा. विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्य आणि परिसरातील उपलब्ध साधनसामग्री यांच्या एकत्रित उपयोगाने समाजोपयोगी उत्पादन करता यायला हवे. विद्यार्थ्यांना उत्पादककार्यात प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी आणि आपली कौशल्ये पडताळणे ह्या बाबी कौशल्यपूरक उपक्रमांतून सहज शक्य होणार आहेत.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये विविध आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जाण्याची कला तसेच परिस्थितीशी स्वकौशल्याने जुळवून घेण्याचे सामर्थ कौशल्यपूरक उपक्रमांमध्ये आहे. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कौटुंबिक, वैयक्तिक व सामाजिक गरजांच्या पूर्ततेसाठी आणि त्यांच्यात विविध समाजोपयोगी मूल्ये वृद्धिंगत व्हावीत यासाठी कौशल्यपूरक उपक्रमांची नितांत आवश्यकता आहे. परिसरातील उपलब्ध निरुपयोगी साहित्यातून कौशल्यपूर्वक नवनिर्मिती करणे यासाठीच कौशल्याधिष्ठित उपक्रमांची योजना केलेली आहे.

कौशल्याधिष्ठित उपक्रमांची उपयोगिता

कौशल्याधिष्ठित उपक्रमांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या गरजा आणि समस्या यांच्याशी निगडित प्रत्यक्ष कृती घडवून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यात्मक दृष्ट्या आत्मविश्वास निर्माण होईल. आनंदमय जीवन जगण्याचे कौशल्य विकसित होईल. विद्यार्थ्यांना समाजोपयोगी कार्यात सहभागी होण्याची गोडी निर्माण होईल.

पर्यावरण संरक्षण व संवर्धन, श्रमाबद्दल आदर, विविध समस्यांवर मात करण्याचे सामर्थ्य, सहकारवृत्ती, सहनशीलता, संस्कृतीरक्षण, दुसऱ्यांची काळजी घेणे, निरुपयोगी वस्तूंपासून नित्योपयोगी सौंदर्याकृती निर्माण करण्याचा ध्यास अशी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे सहज शक्य होईल.

उपक्रमाची कार्यवाही

दिलेल्या उपक्रमांपैकी प्रत्येक सत्रात कोणताही एक उपक्रम घेण्यात यावा.

इयत्ता १ ली

(१) बाहुली तयार करणे.
(२) विविध नैसर्गिक वस्तूंचे ठसे उमटवून सौंदर्याकृती तयार करणे.
(३) कागदी पंखा तयार करणे.
(४) कापसाच्या साध्या वाती तयार करणे.
(५) पुष्पगुच्छ तयार करणे.

इयत्ता २ री

(१) काडीपेटी (रिकामी) पासून आगगाडी तयार करणे.

(२) कागदी होडी तयार करणे.

(३) विविध फळांच्या बिया चिकटवून सौंदर्याकृती तयार करणे.

(४) साधी राखी तयार करणे.

(५) कागदी भिरभिरे तयार करणे.

इयत्ता ३ री

(१) कार्डशीटचा आकाशकंदील तयार करणे.

(२) स्ट्रॉ, मणी, चॉकलेट आवरण, दोरा यांपासून माळा (हार) तयार करणे.

(३) कान हलविणारा कागदाचा ससा तयार करणे.

(४) नारळाच्या करवंटीपासून एक वस्तू तयार करणे.

(५) आईस्क्रीमचे लाकडी चमचे कागदावर चिकटवून विविध प्रतिकृती तयार करणे.

इयत्ता ४ थी

(१) कार्डशीटवर स्टेन्सिलने नक्षी कापून आकाश कंदील तयार करणे.

(२) राखी तयार करणे.

(३) शंख–शिंपल्यांपासून सौंदर्याकृती तयार करणे.

(४) करंज/आंब्यांच्या कोयींपासून खेळणी, पशु–पक्षी तयार करणे.

(५) फुलांच्या माळा तयार करणे.

इयत्ता ५ वी

(१) मातीच्या स्लॅबवर (ठोकळ्यांवर) उठावशिल्प तयार करणे.

(२) उटणे तयार करणे.

(३) पुठ्ठ्याची पत्रपेटी/सी.डी.होल्डर तयार करणे.

(४) कागदाला घड्या घालून आकाशकंदील, वॉलहँगिंग, फुलपाखरू तयार करणे.

(५) वाळलेले गवत, पाने, फुले वापरून भेटकार्ड तयार करणे.

**

ऐच्छिक उपक्रम

(अ) उत्पादक क्षेत्रे

१. क्षेत्र : अन्न

१.१ परसातील बागकाम :

इयत्ता १ ली

(१) परसबाग म्हणजे काय हे समजून घेऊन परिसरातील परसबागांना निरनिराळ्या वेळी (उदा. सकाळ, दुपार, सायंकाळ) भेटी देणे. भाजीपाला, फळभाज्या इत्यादी भाज्यांची माहिती घेणे.

(२) परसबागेत पाहिलेल्या, घरी आणलेल्या भाज्यांची नावे ओळखणे; तसेच फळभाज्या, फळे यांची माहिती घेणे.

(३) पालेभाज्या, फळभाज्या यांची चित्रे जमविणे.

इयत्ता २ री

(१) परिसरातील निरनिराळ्या ठिकाणी भेटी देऊन तेथील झाडांचे निरीक्षण करणे.

(२) परिसरामधील झाडांची लागवड, कशा प्रकारे केली आहे याची माहिती घेणे.

(३) परिसरात कोणते मोठे वृक्ष आहेत ज्यांच्यापासून फळे, फुले मिळतात ते पाहून त्यांची नावे समजून घेणे.

(४) परसबागेतून मिळणाऱ्या भाज्यांचे फायदे समजून घेणे.

इयत्ता ३ री

(१) परसबागेची आखणी कशा पद्धतीने करतात ते समजून घेणे.

(२) परिसरातील जमिनीचा प्रकार कोणता ते समजून घेणे.

(३) जमिनीच्या प्रकारांनुसार तसेच स्थानीय परिस्थितीनुसार कोणत्या भाज्या घेतात त्याची नोंद करणे.

(४) जमिनीच्या प्रतवारीनुसार कंपोस्ट खत किती घालावे याची नोंद ठेवणे.

(५) पिकांनुसार खते, पाणी कशा पद्धतीने देतात त्याची माहिती करून घेणे.

(६) परिसरात भरणाऱ्या प्रदर्शनांना भेटी देऊन फळे, फुले, भाजीपाला यांची नोंद ठेवणे.

इयत्ता ४ थी

(१) पालेभाज्यांची रोपे कशा पद्धतीने तयार करतात ते समजून घेणे.

(२) लावणीसाठी रोपे केव्हा तयार होतात ते माहिती करून घेणे व सदर रोपे कशी काढावीत ते समजून घेणे.

(३) पालेभाज्यांची लागवड करताना लागवडीपूर्वी त्यांचे वर्गीकरण करून त्यानुसार लागवड करणे.

(४) पालेभाज्यांची लागवड कोणत्या दिशेस व का करावी याची माहिती घेणे.

(५) दरवर्षी एकाच भागामध्ये त्याच प्रकारच्या भाज्या का घेऊ नयेत याची विचारणा करून कारण समजून घेणे.